Poornam Ecovision

# पूर्णमिदं

जूलै-ऑगस्ट २०२२





## संपादकीय

नमस्कार,

जुलै - ऑगस्ट महिन्याचे 'पूर्णमिदं' आपल्या हातात देताना खूप आनंद होत आहे. जुलै ऑगस्ट दोन्ही महिने पर्यावरणातील आणि कचरा व्यवस्थापनातील वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी खूप चांगले साजरे झाले.

गृहनिर्माण सोसायटी सदस्य आणि रहिवासी यांच्यासाठी पर्यावरण पूरक सोसायटी या विषयावरचा सोसायटी पदाधिकारी मेळावा या ऑगस्ट महिन्यात पूर्णमतर्फे घेतला गेला. या मेळाव्याला सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय भागातील सुमारे ३३ सोसायटीमधील पदाधिकारी उपस्थित होते. त्यांना कचरा व्यवस्थापन, रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि सौर ऊर्जेवरती वीज प्रकल्प याबाबत माहिती दिली गेली. बहुतेक सोसायटी सदस्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला व पुढे असे प्रकल्प आपल्या सोसायटीत राबवण्याची ग्वाही दिली हे उल्लेखनीय. ऑगस्ट महिन्यामध्ये पूर्णमचा ई-कचरा संकलनासाठी नवीन प्रकल्प सुरू झाला. जे नागरिक पूर्णमच्या संकलन केंद्रावर किंवा संकलन मोहिमांमध्ये भाग घेऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी किंवा ज्येष्ठ नागरिकांसाठी ई-कचरा घरोघरी जाऊन उचलण्याची सुविधा एक ऑगस्ट पासून चालू केली गेली. यामध्ये मुख्यतः घरातील आणि

छोट्या कार्यालयांमधील ई-कचरा घरोघरी जाऊन घेतला जातो. महापालिकेचे माननीय आयुक्त श्री. विक्रम कुमार यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन झाले. या प्रकल्पाची संकल्पना साकारणे आणि या प्रकल्पाला भरीव आर्थिक सहयोग देणे यासाठी आदर पूनावाला क्लीन सिटी इनिशिएटिव्ह यांचे सहकार्य लाभले. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या गाड्या या त्यांच्या माध्यमातून पुरवण्यात आल्या आहेत. ज्यांना ई कचरा द्यायचा आहे त्यांनी गुगल फॉर्म भरून या प्रकल्पात भाग घ्यावा आणि अधिकाधिक लोकांपर्यंत ही योजना पोहोचवावी ही नम्र विनंती.

जुलै -ऑगस्ट महिन्यात पूर्णममध्ये परदेशातील एक पाहुणी स्वयंसेवक म्हणून आली होती. पूर्णमच्या कपडे पुनर्वापर प्रकल्पावर तिने ४५ दिवस स्वयंसेवक म्हणून काम केले आणि वेगवेगळ्या स्वरूपात पूर्णमला आवश्यक असणारी मदत केली. पूर्णमचा प्रकल्प याद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला, गौरविला गेला आणि आपल्या सर्वांच्या कष्टाचे सार्थक झाल्याचे समाधान सर्वांच्या मनात आहे.

पुढील कालावधीत निघणारी नियतकालिके ही विषयवार होणार आहेत. पुढील नियतकालिक हे ‘कपडे पुनर्वापर’ या विषयाला धरून होणार आहे आपण यामध्ये याबद्दलचे लेख आणि इतर माहिती देऊन सहयोग देऊ शकता. वेळोवेळी आपल्याला याबद्दलची माहिती देण्यात येईलच. ऑक्टोबर महिन्यामध्ये आपण ‘कपडे वापर आणि पुनर्वापर’ याविषयीचे एक सर्वेक्षण करत आहोत. आपणा सर्वांच्या यामधील सहभागाचा हे सर्वेक्षण यशस्वी होण्यामागे महत्त्वाचा वाटा राहील, म्हणून आपण नेहमीप्रमाणेच उत्साहाने या सर्वेक्षणात भाग घ्यावा आणि स्वयंसेवक म्हणून इतरांकडून हे सर्वेक्षण भरून घ्यायला मदत करावी, जेणेकरून पुढील वाटचाल ठरवणे सोपे जाईल.

सर्वांना पुढील उत्सवांच्या पर्यावरणपूरक शुभेच्छा......
धन्यवाद....!

**डॉ.राजेश मणेरीकर**

## We are located at

‘Ratnaprabha Bungalow’, Near Maha E-Seva Kendra,
Panchali Sweet Lane, Sinhagad Road, Vadgaon BK,
Pune-411041

Website: www.poornamecovision.org
E-mail: contact@poornamecovision.org
Contact No.: 020-29521862

पूर्णमिदं

# Bimonthly Report
## July-August 2022



### E-waste and Plastic Waste Management

| | |
|---|---|
| Total Society Drives | : 8 |
| Community Drives | : 7 |
| Pocket Drives across Pune City | : 1 |
| Number of Donors | : 678 |
| Ongoing weekly E-waste Collection Centers | : 26 |
| E-waste Collection | : 2660kg |
| Plastic Waste Collection | : 950kg |
| Donated Devices | : 30 |

Donated to:
Persistent Foundation, Suvarna Dhadve (Individual), Shubham Rasne (Individual)

### Volunteering Engagement

No of activities conducted : 5

Activities:
Online lecture on Zero Waste Gardening, GC Melava,
Visit to biodiversity exhibition,
Swachh Bharat Swachh Pune,
Eco-friendly Ganeshotsav activity planning & co-ordination

| | |
|---|---|
| Participated Volunteers | : 450+ |
| No of student volunteers | : 100 |

### Fabric Up-cycling

| | |
|---|---|
| No of cloth collection drives | : 6 |
| Cloth Collection | : 784kg |
| Women Empowered | : 4 |
| No of promotional stalls | : 10 |
| Number of bulk orders completed | : 4 |
| Number of new product samples | : 7 |

### Green Consultancy

Running Composting Units:
1. Laxmi Park Society, Navi Peth
2. Balaji Temple, Pashan
3. Krishnakamal Society, Pashan
4. Café Climate, Hinjewadi - Kasarsai Road

Garden Waste Composting Units:
1. Viloo's Farm House, Theur
2. Pune Cantonment Board

Running Rain Water Harvesting Units:
1. Laxmi Park Society, Navi Peth
2. Yajurved Society, Karvenagar
3. Bhushan Apartment, Karvenagar
4. Cindrella Society, Pashan
5. Private Bungalow, Pashan
6. Yashmitha Ladies Hostel

Running Biogas Units:
Balaji Temple, Pashan



## आमची माती, आमचे जिवाणु...

जल, जंगल, जन, जनावर आणि जमीन ही पंचसूत्री आहे पृथ्वीवरील जीवनाची! या सर्वांचा समतोल अत्यंत महत्वाचा आहे. तो ढासळला तर काय होऊ शकते याची झलक वाढत्या हवामान बदलाच्या स्वरूपात बघत आहोतच. माती वाचवा किंवा 'Save Soil' ही चळवळ सध्या खूप गाजते आहे. माती वाचवा म्हणजे नक्की काय? माती वाचवून आपण कशाचं संवर्धन करणार आहोत हे समजून घेणे खूप महत्वाचे आहे. मातीतील घटक हे मैला मैलावर बदलत जातात. लाल माती, काळी माती, रेती या सगळ्याचे गुणधर्म खूप वेगळे आहेत. प्रत्येक मातीमध्ये वेग-वेगळ्या वनस्पती उगवतात. माती खनिजे आणि सेंद्रिय घटकांचे एक मिश्रण आहे. मातीमध्ये असलेल्या नायट्रोजन, चुना, पोटॅश, फॉस्फोरिक एसिड, लोह, ॲल्युमिनियम, मॅग्नेशियम कार्बोनेट, कॅल्शियमचे प्रमाण आणि मातीची आर्द्रता या आधारावर मातीचा दर्जा ठरतो. या सर्वांच्या प्रमाणाबरोबर बदलतो तो मातीचा Microflora म्हणजे मातीतील जीवाणूंचा समूह. मातीचे संवर्धन करताना ह्या जीवाणूंचा अभ्यास करणे पण महत्वाचे आहे.

मातीमध्ये प्रामुख्याने असेच जीवाणू सापडतात जे त्या मातीतील खनिजे आणि सेंद्रिय घटकांचे सुयोग्य विघटन आणि उपयोग करू शकतात. जीवाणू अन्नसाखळीचा देखील महत्वाचा घटक आहेत. मातीतील मृत प्राणी, पाला पाचोळा यांची कुजण्याची क्रिया घडवून आणण्यात जिवाणूंचा मोलाचा वाटा असतो. जीवाणू आणि झाडांचे सहजीवन (symbiotic relationship) हे सर्वश्रुत आहे. मातीतील जीवाणू हे मातीतील पाण्याचा प्रवेश आणि साठवण, मातीची धूप, मातीतील कीटक आणि रोग यांचे नियंत्रण करणे आणि जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचा पुनर्वापर सुलभ करणे अशी सुद्धा कार्ये करतात. हे जीवाणू शाश्वत पिकोत्पादनाकरता लागणाऱ्या निरोगी मातीकरता खूप महत्वाचे असतात. जीवाणू वनस्पती आणि मातीतील इतर जीवाणू, सुक्ष्मजीव यांची लोकसंख्या नियमित करणे, पोषकतत्वांची जैवउपलब्धता वाढवणे, विषारी सेंद्रिय तत्वांचे डिटॉक्सिफिकेशन करणे आणि बायो रीमेडीशन ही सुद्धा कार्ये करतात.

मातीमध्ये जीवाणूंच्या विस्तृत श्रेणींचे वास्तव्य असते. मातीतील खनिजे, क्षार आणि रसायने यानुसार कुठल्या श्रेणी जास्त हे ठरते. सामान्य निरोगी मातीमध्ये शेकडो बुरशीच्या जाती तर प्रजातींचे जीवाणू आणि Actinomycetes आढळून येतात. १९९० साली नानीपेरी आणि इतर काही अभ्यासकांनी असे त्यांच्या शोधनिबंधात नमुद केले आहे की, १ ग्रॅम चांगली उत्पादकता असलेल्या मातीमध्ये १०० दशलक्ष सूक्ष्मजीव असू शकतात. जेव्हा मातीचा कस कमी होतो त्यावेळी ह्या सूक्ष्मजीवांच्या संख्येत घट तर होतेच पण त्यांच्या काही श्रेणी सुद्धा लुप्त होण्याची शक्यता असते. जीवाणू एकमेकांशी तर संवाद साधत असतातच पण ते वनस्पतींबरोबर त्या मातीच्या अधिवासात असणाऱ्या जनावरांबरोबर सुद्धा जोडले गेलेले असतात आणि जैविक क्रियाकलापांचे जाळे तयार करत असतात.

या जीवाणूंचे महत्व हे प्रामुख्याने शेतीच्या दृष्टीने जास्त अभ्यासले गेले आहे. मातीमध्ये होणाऱ्या अनेक प्रक्रियांमध्ये जीवाणू कार्यरत असतात. वनस्पतींच्या वाढीकरिता लागणाऱ्या कार्बन आणि नैट्रोजन सारख्या पोशक तत्वांच्या चक्रात यांचा सहभाग असतो. मातीतील पोषण तत्वांच्या पुनर्वापराकरता ते जबाबदार असतात. जीवाणू प्रामुख्याने या गोष्टीं करता उपयोगी असतात-

१) सेंद्रिय पदार्थांचे विघटीकरण आणि मातीचे एकत्रिकरण २) प्राणी, पक्षी व किटकांच्या उपउत्पादनांचा चया पचय

३) अजैविक परिवर्तन ४) नैट्रोजनचे वापरण्यायोग्य स्वरूपात परिवर्तन करणे.

ऋतुमानाप्रमाणे जीवाणूंचे प्रकार आणि संख्या नैसार्गिकरीत्या बदलत असते. हे बदल अन्नसाखळीच्या नियंत्रणाकरता महत्वाचे असतात.

बेसुमार जंगलतोड, वाढते शहरीकरण, प्रदुषण, घातक रसायनांचा वापर या सर्वांचा परिणाम मातीवर आणि त्यामधील जीवाणूंवर सुद्धा होतो आहे. मातीचा कस कमी होतो तेव्हा त्यातील जीवाणू नष्ट झालेले असतात. अश्या सर्व पद्धती ज्या टिकाऊ आणि निसर्गाशी विसंगत आहेत त्यामुळे मातीतली जैवविविधता सुद्धा नष्ट होते आहे. या जैवविविधते बद्दल नसलेले ज्ञान, जागरूकता आणि असलेले गैरसमज हे ह्या ऱ्हासाला कारणीभूत आहेत. मातीतील या जीवांचा अभ्यास आणि त्यांचे संवर्धन सुद्धा मातीच्या संवर्धनाकरता गरजेचे आहे.

**डॉ तेजस्विनी पाचपोर**
सूक्ष्मजीव अभ्यासक



Wedding gift order completion



Awareness Session at School




Recognition Certificate for Participation in Swachh Bharat Swachh Pune




Inauguration of Door to Door E waste collection




Door to door E-waste collection



Vehicle donation program by Metro Global Solution Center Pvt Ltd



Old cloth collection drive in Viman nagar




Fabric Stall in Vivan Nagar










# OUR PRODUCTS

Poornam Ecovision